नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सन २०१२-१३/२०१३-१४ च्या आर्थिक वर्षातील आर-३ लेखा विवरणपत्राच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी / कोषागार अधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य.
राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई,
क्रमांक : राअदेअ-२०१४/२०१२-१३/२०१३-१४/आर-३ वितरण/ ४५५
दिनांक : २५-०६-२०१४.

वाचा :- १) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनियो १००७/१८/सेवा-४, दि. ०७/०७/२००७.
२) शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो २०१३/आर-३/प्र.क्र.७२/सेवा-४, दि. ३१/०९/२०१३.

परिपत्रक :-

नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सन २००७-०८ ते सन २०११-१२ पर्यंतची वार्षिक लेखा विवरणपत्रे ( नमुना आर-३ ) या योजनेच्या जुन्या प्रणालीमधून वितरीत करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत सन २०१२-१३ व सन २०१३-१४ चे आर-३ विवरणपत्र अनुक्रमे माहे जून-२०१४ व जुलै-२०१४ पर्यंत वाटप करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. माहे एप्रिल, २०१२ पासून एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीअंतर्गत या योजनेच्या नवीन आज्ञावलीचे विकसनाचे कामकाज हाती घेण्यात आले. सेवार्थ प्रणालीच्या माध्यमातून दरमहा होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातील कपातीची माहितीचे संस्करण या आज्ञावलीद्वारे करण्यात येते.

माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये जुन्या डिसीपीएस प्रणालीवरील डाटा नवीन आयएफएमएस प्रणालीवर स्थलांतरीत करण्यात आला आहे. परंतू डाटा स्थलांतरीत करताना काही तांत्रिक चुका निदर्शनास आल्याने ( जसे कर्मचाऱ्याच्या कपातीचा तपशिल अचूक न येणे, रकमा चुकीच्या दर्शविणे, मिसिंग क्रेडीट दर्शविणे, सुरुवातीची व शेवटची शिल्लक चुकीची दर्शविणे इ. ) नवीन प्रणालीवर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वित्तीय वर्ष २००७-०८ ते २०११-१२ च्या वार्षिक विवरणपत्रांमध्ये ( आर-३ ) त्रुटी आढळून येत होत्या. सदर त्रुटींचे निराकरण करण्यासाठी समयबध्द कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच नवीन प्रणालीवर निर्गमित करण्यात येणाऱ्या वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या लेखा विवरणपत्रांमध्येही आहरण व संवितरण अधिकारी व कोषागार अधिकारी यांनी देयके तयार व पारित करताना केलेल्या अनियमिततांमुळे मोठ्या प्रमाणावर मिसिंग क्रेडीट दिसून येणार आहेत.

यामुळे सर्व कोषागार अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांच्या वार्षिक लेखा विवरणपत्रांमध्ये कपातीचा तपशिल चुकीचा येत आहे अथवा निरंक दर्शविला जात आहे अशा बाबतीत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या कपातीच्या अनुसुच्या (नमुना आर-२ ) अन्वये पडताळणी करावी आणि अशा त्रुटींच्या बाबतीतील प्रस्ताव विवरणपत्रांच्या प्रतीसह कोषागार अधिकाऱ्यांकडे जमा कराव्यात. कोषागार अधिकारी यांनी आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाची अचूकता त्यांच्या कार्यालयातील अभिलेखाशी पडताळून उचित कार्यवाही प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत करावी. आवश्यक असल्यास प्रस्ताव उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांच्या कार्यालयास सादर करावा.

याशिवाय सन २०१३-१४ चे वार्षिक विवरणेही माहे ऑगस्ट-२०१४ अखेर निर्गमित करावयाची असल्याने मॅन्युअल मॅचिंग प्रोसेस सन २०१२-१३ प्रमाणे कोषागार अधिकारी यांनी १५ जुलै-२०१४ अखेर पूर्ण करुन विभागीय सहसंचालकांमार्फत उचित प्रमाणपत्रे राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयास सादर करावीत. प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचे बाबतीत चलान मोड्यूल दिले असल्याने त्याही बाबतीत कर्मचारी / शासनाचे अंशदान दोन्ही जमा रकमांची चलने प्राप्त झाली असल्याची खात्री करण्यात यावी.

विषयांकित बाबतीत आहरण व संवितरण अधिकारी यांना कोषागाराकडून लेखा विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यातील त्रुटींबाबत उचित कार्यवाही वेळीच केली गेली नाही तर याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कोषागाराची राहील.

विभागीय सहसंचालक आणि कोषागार अधिकारी यांनी हे परिपत्रक सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. तसेच त्यांच्या कार्यालयांतील सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

(स.अ.मु. नकवी)
संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती.
२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३) कोषागार अधिकारी ( सर्व ).